अक्कलकोट, जि. सोलापूर येथील तहसील कार्यालयीन इमारतीच्या बांधकामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक:- बीएलडी २०१४/प्र. क्र. १७७/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०६ फेब्रुवारी, २०१८.

<u>संदर्भ</u>:- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. बीएलडी-३७०९/प्र.क्र.१४२/ई-८, दि.२८ फेब्रुवारी, २००९.
२) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र.कार्या.१/सा.प्र.१/आरआर/७८८/१४, दि.०९/०९/२०१४.

<u>प्रस्तावना:-</u>

अक्कलकोट, जि. सोलापूर येथील तहसील कार्यालयीन इमारत बांधकामाच्या रु.१,४७,८१,६००/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रक व नकाशास शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.बीएलडी-३७०९/प्र.क्र.१४२/ई-८, दि. २८ फेब्रुवारी, २००९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. आता विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी संदर्भ क्र. २ दि.०९/०९/२०१४ च्या पत्रान्वये सदर इमारतीच्या कामामध्ये प्रामुख्याने दरसूचीत झालेली वाढ, भाववाढ व अधिक दराची निविदा स्विकारल्यामुळे झालेली वाढ याचा समावेश करुन रु.२,१९,१२,१११/- इतक्या खर्चाच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकांस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

२. सदर तहसील कार्यालयाच्या इमारत बांधकामाची उप अभियंता, सा. बां. उपविभाग, अक्कलकोट यांनी सन २०१०-११ च्या जिल्हा दर सुचीवर आधारित रु.२,१९,१२,१११/- किंमतीची स्वतंत्र अंदाजपत्रके तयार करुन सादर केली आहेत. सदर अंदाजपत्रके विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी संदर्भाधीन दि. ०९/०९/२०१४च्या पत्रान्वये शासनास सादर केली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने छाननीअंती कार्याजयीन इमारत बांधकामाच्या रु.२१९.१२ लाख इतकी रक्कम निश्चित केली असून वित्त विभागाने सदर प्रस्तावास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दर्शविली आहे. उक्त सहमतीच्या अनुषंगाने अक्कलकोट, जि. सोलापूर येथील तहसील कार्यालयीन इमारत बांधकामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

अक्कलकोट, जि. सोलापूर येथील तहसील कार्यालयाच्या इमारत बांधकामासाठी संदर्भाधीन दि.२८ फेब्रुवारी, २००९ च्या शासन निर्णयान्वये रु.१,४७,८१,६००/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली होती. सदर तहसील कार्यालयीन इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकातील खर्चामध्ये झालेली वाढ विचारात घेऊन सोबतच्या विवरणपत्र -अ॰ अनुसार **रु.२१९.१२ लाख** (रुपये दोन कोटी एकोणवीस लाख बारा हजार फक्त) च्या खर्चास शासन सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे.

२. या मान्यतेनुसार सदर बांधकामावरील मंजूर करण्यात येत असलेली रक्कम पुढीलप्रमाणे आहे.-

अ. क्र.	बाबींचा तपशिल	मुळ प्रशासकीय मान्यतेनुसार रक्कम (रु. लाखात)	सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी रक्कम (रु. लाखात)	वाढ (रु. लाखात)	बचत (रु. लाखात)	टक्केवारी	वाढीचे / बचतीचे स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६	७	८
१	मुख्य इमारत	११३.०१८	१५६.५९	४३.४१	--	--	१) दरसूची वाढ २) जादा दराची निविदा स्विकृती ३)भाववाढ तसेच प्रत्यक्ष काम करताना काही परिणामामध्ये झालेली वाढ
२	वॉटर सप्लाय ॲन्ड सॅनिटेशन	९.०५	--	--	९.०५	--	
३	विद्युतिकरण	१०.१९	५.१३	--	५.०६	--	
४	जमिन सुधारणा	८.६०	--	--	८.६०	--	
५	जास्त दराची निविदा	--	३२.३८	३२.३८	--	--	
६	भाववाढ	--	१३.७०	१३.७०	--	--	
७	संगणकीय निधी - २ %	२.२६	३.२३	०.९७	--	--	
८	आकस्मिक खर्च - ४ %	४.५३	६.४७	१.९४	--	--	
९	कार्य विमा	--	१.६२	१.६२	--	--	
	एकूण	१४७.८१	२१९.१२	९४.०२	२२.७१	--	

३. प्रस्तावित बांधकामावरील पुर्वी दिलेल्या आर्थिक अनुदानाची रक्कम वगळून अधिकचा खर्च लेखाशिर्ष “मागणी क्रमांक एच-८ ४०५९ - सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती ०५१, बांधकाम (०७) जिल्हा प्रशासन (योजनांतर्गत) ५३, मोठी बांधकामे (०७)(०१) मोठी बांधकामे (४०५९ ०७९९) (०७) (०२) आस्थापना खर्च (४०५९ ०८०५) (०७)(०३) हत्यारे व

संयंत्र यांचा खर्च (४०५९ ०८१४)" या उद्दिष्टाखालील अर्थसंकल्पीय अनुदानामधून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४०४/व्यय-९, दि.२९/१२/२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०२०६१२४७१४९६१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Nilkanth Pandurang Awhad

Digitally signed by Nilkanth Pandurang Awhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e42a88b7548c3a7d48b7a77d85de3524cf8f2e7e0f87091223ad803d4d4a2a31, cn=Nilkanth Pandurang Awhad
Date: 2018.02.06 14:03:11 +05'30'

(नि. पां. आव्हाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
२. जिल्हाधिकारी, सोलापूर.
३. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर.
५. तहसीलदार, अक्कलकोट, जि. सोलापूर.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा - सोलापूर
७. उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-३), मंत्रालय, मुंबई-३२.
८. उप सचिव, वित्त विभाग, कार्यासन- व्यय-९, मंत्रालय, मुंबई-३२.
९. सह सचिव, कार्यासन ब-१, महसूल व वन विभाग, मुंबई-३२.
१२. निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मुंबई-३२.

शासन निर्णय क्र. बीएलडी-२०१४/प्र.क्र.१७७/ई-८, दि.०६ फेब्रुवारी, २०१८ चे सहपत्र)

"सहपत्र-अ"

Name of Work: Revised Estimate of Tahsildar Office at Akkalkot, Dist. Solapur.

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Particulars	Amount Rs.
१)	Proper Building	१५६५९५३३.००
२)	above Tender २०.०२%	३२३७७०३.००
३)	Electrification and Street Lighting ९ %	५१२८११.००
४)	Computerisation २%	३२३४४७.००
५)	contingency ४ %	६४६८९४.००
६)	Insurance on Work contracts १ %	१६१७२३.००
७)	Price Escalation १२ %	१३७००००.००
	Total Rs	२१९१२१११.००

SAY RS. २१९.१२ lac